
आग

इथियोपियाची लोककथा

लेखक: हाइन्झ जानिश,
फॅब्रिसिओ वॅन्डेनब्रोक




ही इथियोपियाची पारंपरिक लोककथा आहे. एक गुलाम बरीच वर्षे आपल्या मालकाची इमानेइतबारे सेवा करतो. एक दिवस, "आपल्याला मुक्त करावे," अशी विनंती तो मालकाला करतो. त्यावर मालक हसून त्याला एक अट घालतो. "गुलामाने कडाक्याच्या थंडीत एक रात्र उंच पर्वतावच्या शिखरावर काढावी, तेही विवस्त्र अवस्थेत." निराश होऊन गुलाम एका समजूतदार वृद्ध व्यक्तिकडे जातो. ती वृद्ध व्यक्ती गुलामाला मदत करते.

इथियोपियाच्या या लोककथेत जगभरातील सर्व लोकांकरिता एक संदेश लपला आहे.

आग

मराठी अनुवादः सुशील मेन्सन







इथून जवळच एका देशात एक माणूस राहात होता. तो गुलाम होता.
तो आपल्या मालकाच्या कापसाच्या शेतात दिवस-रात्र राबत असे.
रात्री घरी परतल्यावर तो मालकाच्या घराची साफसफाई करत असे.
त्यानंतर तो जनावरांना खायला घालत असे, मग लाकडे तोडत असे.
मध्यरात्र होईपर्यंत तो फक्त कामच करत असे.
अशी बरीच वर्षे गेली. एक दिवस थकलाभागला गुलाम आजारी पडला.

सहनशक्ती संपल्यावर गुलाम मालकाकडे गेला आणि म्हणाला, “मी इतकी वर्षे तुमची इमानेइतबारे सेवा केली. तुम्ही अनेकदा मला मुक्त करण्याचे वचनही दिले. आता काय करू, म्हणजे तुम्ही मला एकदाचे मुक्त कराल?”



मालक गुलामाच्या बोलण्यावर हसू लागला. “तुला मुक्त व्हायचंय? एका अटीवर! तो पर्वत दिसतोय? आज रात्री त्याच्यावर चढून जा. वर सर्वत्र बर्फच बर्फ आहे आणि थंडी तर इतकी आहे की तुझा श्वाससुद्धा गोठून जाईल. रात्रभर तू तिथे राहून दाखव.






आणि हो, अंगावर एकही कपडा न घालता रात्र घालवायचीस तिथे. यातून सहीसलामत वाचलास, तर मी तुला मुक्त करीन. पण लक्षात ठेव, या कामात तू कुणाचीही मदत घेता कामा नये. तुला कुणी गरम कपडे देता कामा नये. तू अगदी एकटं, विवस्त्र राहायचंस तिथे.”

निराश होऊन गुलाम त्याच्या वृद्ध मित्राकडे गेला. हा वृद्ध मित्र एक समजूतदार, शहाणा माणूस होता. “काय करू?” गुलामाने विचारले, “अशी रात्र घालवली तर मी जिवंत तरी राहीन का? तिथल्या थंडीनेच मरून जाईन मी.”


वृद्ध मित्राने काही वेळ विचार केला.
“मी मदत करीन तुला,” थोड्या वेळाने तो म्हणाला.






संधिप्रकाश पसरल्यावर गुलाम गावच्या सीमेवर असलेल्या पर्वताच्या शिखरावर चढून गेला.

दरम्यान, वृद्ध मित्र जळणाची बरीचशी लाकडे घेऊन शेजारचा पर्वत चढून गेला.



गुलाम शिखरावरील बर्फात अनवाणी अवस्थेत उभा राहिला. त्याने अंगावरचे कपडे काढून टाकले. आता तो थंडीने कुडकुडू लागला. त्याच्या अवतीभवती असलेले सारे खडक बर्फाने झाकलेले होते. त्याला श्वास घेण्याचेही धैर्य होत नव्हते.



अचानक, शेजारच्या पर्वतशिखरावर आग दिसू लागली. आगीच्या ज्वाळा तेजस्वी आणि उंच होत्या.

खोल अंधारात दिवा दिसावा, तसे वाटले गुलामाला.

आगीच्या शेजारी वृद्ध मित्राची आकृती जेमतेम दिसत होती. वृद्ध मित्र आग जळत ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करत होता. वेगवान वाऱ्याने आग विझू नये, म्हणून तो आगीत सतत लाकडे टाकत होता.

गुलाम या आगीकडे टक लावून पाहात राहिला. तो विवस्त्र होता आणि त्याच्या सभोवती बर्फच बर्फ होते. पण आता तो कुडकुडत नव्हता. त्याच्या वृद्ध मित्राने गर्द अंधारात केलेली ती आग त्याच्यासाठीच तर होती. ती आगच आता त्याला ऊब देऊ लागली.





रात्रभर गुलाम त्या आगीकडे पाहात राहिला, त्याची उब घेत राहिला. पर्वतावरची थंडी त्याचे काही बिघडवू शकली नाही.

पुढच्या दिवशी सकाळी, उजाडल्यावर, गुलाम पर्वतावरून उतरला आणि मालकाकडे गेला.

मालक त्याच्यावर संतापला. खरंतर, त्याला गुलामाला मुक्त करायची इच्छा नव्हती. पण त्याला पर्यायही नव्हता.

“जा,” तो गुलामाला म्हणाला.





समाप्त